# महाराष्ट्र शासन

क्र.:- अधापु २०१४/प्र.क्र.९६/नापु २२
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई
दिनांक:- ०९ मार्च, २०१५

प्रति,

१) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
२) सर्व उपायुक्त (पुरवठा),
३) सर्व जिल्हाधिकारी,
४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/ सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,

**विषय-: राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृह यांना माहे ऑक्टोबर, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीकरिता अन्नधान्याचे मासिक नियतन मंजूर करण्याबाबत.**
**संदर्भ :-१) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक ४-६/२०१४-BP-II, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५**
**२) शासन निर्णय क्रमांक साविव्य-१००२/११३७/प्र.क्र. ९७३/ ना.पु. २८, दि. २६.४.२००२.**

राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृहे यांना माहे ऑक्टोबर, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीकरीता बी.पी. एल. दराने अन्नधान्याचे मासिक नियतन वितरीत करण्यासाठी ४५०० मे. टन गहू व १९०० मे. टन तांदूळ असे एकूण ६४०० मे. टन अन्नधान्य केंद्रशासनाने त्यांच्या दि. २७.२.२०१५ च्या संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र राज्यासाठी मंजुर केले आहे. त्यानुसार जिल्हानिहाय नियतन सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आले आहे. संबंधीतांनी सदर नियतनाची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या नजिकच्या गोदामातून बी.पी.एल. दराने अन्नधान्याचे पैसे भरुन करावे.

केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त दि. २७.२.२०१५ च्या पत्रान्वये माहे ऑक्टोबर, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीच्या अन्नधान्याची रक्कम भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यासाठी व अन्नधान्याची उचल करण्यासाठी दि. ३१.३.२०१५ पर्यंतचा कालावधी विहित केला आहे. त्यानुसार भारतीय अन्न महामंडळाकडे अन्नधान्याची रक्कम जमा करुन अन्नधान्याची उचल केंद्र शासनाच्या तत्कालीक/ अनुषंगिक सूचनेनुसार करण्यात यावी. सबब भारतीय महामंडळाच्या नजिकच्या क्षेत्रिय कार्यालयाशी संपर्क साधून विहित मुदतीतच अन्नधान्याची रक्कम भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करुन अन्नधान्याची पूर्ण उचल होईल याची दक्षता घ्यावी.

कल्याणकारी संस्था व वसतीगृहे यांना अन्नधान्य वितरीत करावयाच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर आदेश संदर्भाधीन दि. २६.४.२००२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार अन्नधान्य वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

क्षेत्रिय कार्यालयांकडून यापूर्वी शासनास कळविण्यात आलेल्या कल्याणकारी संस्थांच्या व त्यावरील लाभार्थ्यांच्या आकडेवारीनुसार उपरोक्त नियतन देण्यात येत आहे. शासनाच्या असे निदर्शनास

आले आहे की, यापूर्वी शासनास कळविलेल्या आकडेवारीनुसार संस्था कार्यरत नसून कार्यरत संस्थांच्या आकडेवारीमध्ये तफावत आहे. केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये सूचित केल्यानुसार दि. ३१.३.२०१५ पर्यंत अन्नधान्याची उचल पूर्ण करण्यात यावी व संस्थांच्या व लाभार्थ्यांच्या सुधारित आकडेवारीसह माहे सप्टेंबर, २०१४ अखेर शिल्लक असलेल्या अन्नधान्याच्या आकडेवारीसह माहे मार्च, २०१५ अखेरचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास विनाविलंब दि. २०.४.२०१५ पर्यंत सादर करावे.

सोबत :- विवरणपत्र

(हेमंत वाडीकर)
कक्ष अधिकारी

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१) महाव्यवस्थापक, व भारतीय अन्न महामंडळ, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे मंजूर केलेले नियतन मुक्त (release) करण्याच्या सुचना सर्व जिल्हा प्रबंधक भारतीय अन्न महामंडळ यांना तात्काळ द्याव्यात.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव , मुंबई, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

३) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई. यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील महाफुड आज्ञावलीव्दारे प्राप्त करुन घ्यावा.

४) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा तसेच सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर आदेशान्वये केलेले नियतन विचारात घेऊन अन्नधान्याचे वाटप करावे.

(हेमंत वाडीकर)
कक्ष अधिकारी

प्रत,

१) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
यांना विनंती करण्यात येते की, वरील प्रमाणे प्राप्त झालेली माहिती तपासून राज्याची एकत्रित माहिती शासनास सादर करावी.

२) कक्ष अधिकारी, ना.पु. २८, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

३) अवर सचिव (संगणक कक्ष), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत नियतनाचे आदेश विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावेत.

४) निवड नस्ती – ना.पु.२२

शासन पत्र क्रमांक अधापु २०१४ / प्र.क्र. ९६ / ना.पु. २२, दिनांक ०९ मार्च,२०१५ सोबतचे विवरणपत्र

# MONTHLY ALLOCATION TO WELFARE INSTITUTIONS SCHEME FOR THE PERIOD FROM OCTOBER, 2014 TO MARCH, 2015

| SR.NO. | DISTRICTS | NO OF INSTIUTIONS | NO OF BENEFICIARIES | QUANTUM | | | MONTHLY ALLOCATION (MT) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL |
| 1 | MUMBAI | 73 | 14718 | 10 | 5 | 15 | 135 | 40 | 175 |
| 2 | THANE AND PALGHAR | 168 | 49036 | 5 | 10 | 15 | 225 | 264 | 489 |
| 3 | RAIGAD | 17 | 7107 | 5 | 10 | 15 | 33 | 38 | 71 |
| 4 | RATNAGIRI | 55 | 4083 | 5 | 10 | 15 | 19 | 22 | 41 |
| 5 | SINDHUDURG | 13 | 869 | 5 | 10 | 15 | 4 | 5 | 9 |
| 6 | NASIK | 194 | 43207 | 10 | 5 | 15 | 396 | 116 | 512 |
| 7 | DHULE | 100 | 12565 | 10 | 5 | 15 | 115 | 34 | 149 |
| 8 | NANDURBAR | 86 | 5035 | 10 | 5 | 15 | 46 | 14 | 60 |
| 9 | JALGAON | 130 | 17829 | 10 | 5 | 15 | 163 | 48 | 211 |
| 10 | AHMEDNAGAR | 106 | 8605 | 10 | 5 | 15 | 79 | 23 | 102 |
| 11 | PUNE DSO | 87 | 12023 | 10 | 5 | 15 | 110 | 32 | 142 |
| 12 | PUNE FDO | 120 | 48910 | 10 | 5 | 15 | 448 | 132 | 580 |
| 13 | SATARA | 132 | 9516 | 10 | 5 | 15 | 87 | 26 | 113 |
| 14 | SANGALI | 70 | 4500 | 10 | 5 | 15 | 41 | 12 | 53 |
| 15 | SOLAPUR DSO | 78 | 5955 | 10 | 5 | 15 | 55 | 16 | 71 |
| 16 | SOLAPUR FDO | 7 | 1658 | 10 | 5 | 15 | 15 | 4 | 19 |
| 17 | KOLHAPUR | 60 | 5670 | 10 | 5 | 15 | 52 | 15 | 67 |
| 18 | AURANGABAD | 97 | 9034 | 10 | 5 | 15 | 83 | 24 | 107 |
| 19 | JALNA | 70 | 9317 | 10 | 5 | 15 | 85 | 25 | 110 |
| 20 | BEED | 215 | 19447 | 10 | 5 | 15 | 179 | 52 | 231 |
| 21 | NANDED | 271 | 32771 | 10 | 5 | 15 | 300 | 88 | 388 |
| 22 | PARBHANI | 171 | 13025 | 10 | 5 | 15 | 119 | 35 | 154 |
| 23 | HINGOLI | 75 | 8143 | 10 | 5 | 15 | 75 | 22 | 97 |
| 24 | LATUR | 225 | 17182 | 10 | 5 | 15 | 158 | 46 | 204 |
| 25 | OSMANBAD | 114 | 9967 | 10 | 5 | 15 | 91 | 27 | 118 |
| 26 | AMRAVATI | 170 | 25000 | 10 | 5 | 15 | 229 | 67 | 296 |
| 27 | AKOLA | 178 | 8054 | 10 | 5 | 15 | 74 | 22 | 96 |
| 28 | WASHIM | 103 | 7924 | 10 | 5 | 15 | 73 | 21 | 94 |
| 29 | BULDHANA | 255 | 15794 | 10 | 5 | 15 | 145 | 42 | 187 |
| 30 | YAVATMAL | 259 | 26287 | 10 | 5 | 15 | 241 | 71 | 312 |
| 31 | NAGPUR DSO | 113 | 11167 | 10 | 5 | 15 | 102 | 30 | 132 |
| 32 | NAGPUR FDO | 67 | 9955 | 10 | 5 | 15 | 91 | 27 | 118 |
| 33 | WARDHA | 86 | 5856 | 10 | 5 | 15 | 54 | 16 | 70 |
| 34 | BHANDARA | 86 | 8014 | 5 | 10 | 15 | 37 | 43 | 80 |
| 35 | GONDIA | 113 | 17776 | 5 | 10 | 15 | 81 | 96 | 177 |
| 36 | CHANDRAPUR | 164 | 29600 | 5 | 10 | 15 | 136 | 159 | 295 |
| 37 | GADCHIROLI | 154 | 27112 | 5 | 10 | 15 | 124 | 146 | 270 |
| | TOTAL | 4482 | 562711 | | | | 4500 | 1900 | 6400 |